# शालेय वार्षिक अहवाल २०१०-११

**एस.एस.सी. परीक्षा मार्च २०१० -**

निकाल - २८४-२५९ (९१.१९%)

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नांव | गुण | टक्के |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | कु. साळवी उमा अनिल | ५३० | ९६.३६% |
| द्वितीय क्रमांक | कु. पेणकर अनुप अशोक | ५२९ | ९६.१८% |
| तृतीय क्रमांक | कु. सुर्वे पूर्वा प्रवीण | ५२५ | ९५.४५% |
| तृतीय क्रमांक | कु. पांचाळ अमेय रमाकांत | ५२५ | ९५.४५% |
| चौथा क्रमांक | कु. रावणंग ऋतुराजरमेश | ५२४ | ९५.२७% |
| पाचवा क्रमांक | कु. राणे अमेय महादेव | ५२१ | ९४.७३% |
| | कु. सावंत प्रथमेश प्रकाश | ५२१ | ९४.७३% |

उच्चतम गुणधारक विद्यार्थी (२००९-२०१०)

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | विषय | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | सुर्वे पूर्वा प्रविण० | मराठी | ९२/१०० |
| २. | पेणकर अनुप अशोक | इंग्रजी | ९३/१०० |
| ३. | राणे अमेय महादेव - | संस्कृत (सं.) | ९९/१०० |
| ३. | रावणंग ऋतुराजरमेश - | संस्कृत(संपूर्ण) | ९९/१०० |
| ४. | सावंत विभावरी प्रकाश | गणित | १५०/१५० |
| ५. | साळवी उमा अनिल | विज्ञान | ९७/१०० |
| ५. | पेणकर अनुप अशोक | विज्ञान | ९७/१०० |
| ६. | शिवगण सागर सुधाकर- | हिंदी(संपूर्ण) | ८४/१०० |
| ७. | टोपकर प्रियांका कृष्णा- | हिंदी/संस्कृत | ९३/१०० |
| ८. | पांचाळ अमेय रमाकांत- | समाजशास्त्र | ९६/१०० |

९० ते ९६ गुण २६ विद्यार्थी विशेष प्रावीण्य - ९० विद्यार्थी

८० ते ८९ गुण २७ विद्यार्थी प्रथम श्रेणी - ७८विद्यार्थी

७० ते ७९ गुण ६० विद्यार्थी द्वितीय श्रेणी - ८२ विद्यार्थी

तृतीय श्रेणी - ०९ विद्यार्थी

एकूण - ११३ विद्यार्थी एकूण - २५९ विद्यार्थी

## खेळातील नैपुण्य

| | | |
|---|---|---|
| कु. मानसी सतीशराजे सुर्वे | ५२०+२५ ९९.०९%- | बॅडमिंटन |
| कु. गोगटे मैत्रेयी राजन | ४९३+२५ ९४.१८%- | कॅरम |
| कु. लेले नील सतीश | ९६.१८%- | बॅडमिंटन |

## माध्यमिक शिष्यृत्ती परीक्षा (इ.७वी)

माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेला एकूण ७० विद्यार्थी बसले, त्यांपैकी ५८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. परीक्षेचा फेब्रुवारी २०१० चा निकाल ८२.८६% लागला. त्यांपैकी १२ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले.

- शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी

१. कु. वैद्य चैतन्य श्रीरंग (जिल्ह्यात ३ रा)
२. कु. सुर्वे शार्दुल प्रविण
३. कु. वराडकर कोल रामचंद्र
४. कु. भागवत चिन्मय संजय
५. कु. भुवड मयुरी भरत
६. कु. झगडे उन्नती अनिल
७. कु. भिडे मानसी संदीप
८. कु. शेंबवणेकर सुशाम शरद
९. कु. कांबळे कल्पेश संजय
१०. कु. आंबेरकर ऐशर्या दिपक
११. कु. दांडेकर निरज किशोर
१२. कु. कडवईकर सोहम सतोष

मार्गदर्शक शिक्षक - श्री. शेलार , श्री. पडवेकर ,सौ. साखळकर सौ. बागवे , सौ. अभ्यंकर , सौ. कांबळे.

## महाराष्ट्र टॅलेंट सर्च - इ. ६ वी

इ. ६ वी परीक्षेकरिता ७३ विद्यार्थी सहभागी झाले.परीक्षेचा निकाल ९७.५९% लागला. यांपैकी एकूण ०३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी

१. कु. शिऊडकर शिल्पा शिवाजी
२. कु. नाचणकर प्रथमेश राजकुमार
३. कु. गार्डी प्रथमेश विनायक

**प्री.एन.टी.एस. परीक्षा**: प्री.एन.टी.एस. परीक्षा: (इ.७वी) परीक्षेक रिता कु. वराडकर कोल, रत्नागिरी केंद्रात ५ वी व राज्यात ६० व्या स्थानी आली. सदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन श्री. पडवेकर सर यांनी केले.

## महाराष्ट्र ज्ञानपीठ २०१०

इ.५ वी गणित परीक्षा - एकूण ४७ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते.या विद्यार्थ्यांना श्री. पडवेकर यांनी मार्गदर्शन केले.

१) बेळेकर अनामय महेश- ९७/१०० मिळवून विद्यापीठात पहिला
२) वाडेकर मिथिला मोहन -९३/१०० मिळवून प्रशालेत दुसरी
२) कुवळेकर विनीत विवेकानंद - ९३/१०० मिळवून प्रशालेत दुसरा.
३) भुते उत्कर्षा प्रसाद - ९१/१०० मिळवून प्रशालेत तिसरी
३) वाडकर अनिकेत निलेश -९१/१०० मिळवून प्रशालेत तिसरा.

इ.६वी गणित परीक्षा -

एकूण ७१ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले.

१) कु. शिऊडकर शिल्पा शिवाजी ९९/१०० विद्यापीठात पहिली
२) कु. नाचणकर प्रथमेश राजकुमार ९६/१०० विद्यापीठात चौथा
२) कु. वेंगुर्लेकर प्रणव त्रिविकम ९६/१०० विद्यापीठात चौथा
३) कु. भागवत कस्तुरी भास्कर ९५/१०० विद्यापीठात तिसरी

मार्गदर्शक - सौ. अभ्यंकर ए. एन

**इंग्रजी बाह्य परीक्षा -**

मराठा मंदिर, मुंबई या संस्थेतर्फे इ. ५ वी ते ७ वी साठी महाराष्ट्र ज्ञानपीठ परीक्षेसाठी आपल्या प्रशालेतील ज्ञानपीठ इंग्रजी परीक्षा आयोजित करण्यात येते. फेब्रुवारी २०१० मध्ये घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी आपल्या प्रशालेतील एकूण १५६ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते.

या तीनही परीक्षांचा निकाल पुढील प्रमाणे

इ. ५ वी ९८.७५%

इ. ६ वी १००%

इ. ७ वी ९६%

महाराष्ट्र ज्ञानपीठ इंग्रजी विषयासाठी प्रशालेतील सौ. एन. व्ही. कोळपे व श्री. पी. एस. जधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा २०१०** -

बालवैज्ञानिक परीक्षेसाठी इ.६वी चे १५ विद्यार्थी तर इ.९वी चे १४ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. त्यांपैकी इ. ६ वी चे ४ विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी तर इ. ९ वी चे ३ विद्यार्थी प्रात्यक्षिक स्पर्धेसाठी निवडले गेले आहेत.

राष्ट्रभाषा प्रवेशिका परीक्षा इ. ७ वी -

परीक्षेला बसलेले विद्यार्थी

उत्तीर्ण विद्यार्थी निकाल ९८%

प्रथम क्रमांक - कु. मानसी भिडे

द्वितीय क्रमांक - कु. प्रियदर्शनी पाडवी

तृतीय क्रमांक - कु. राधा सिनकर

मार्गदर्शक श्री. एस. वाय. आयरे

**राष्ट्रभाषा सुबोध परीक्षा इ. ८ वी -**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी २५

उत्तीर्ण विद्यार्थी २५ - निकाल १००%

प्रथम क्रमांक - कु. ज्योती नाचणकर १३२/२००

द्वितीय क्रमांक - कु. सायली वाडेकर १३१/२००

तृतीय क्रमांक - कु. आरती कांबळे १३०/२००

हिंदी -बाह्य परीक्षा -

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पूणे तर्फे फेब्रुवारी २०१० मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल-

इ.५वी साठी बालबोधिनी परीक्षा

परीक्षेला बसलेले विद्यार्थी ४३ , उत्तीर्ण -४३, निकाल - १००%

प्रथम - कु. प्रगती दिनकर माळी. हिने १०० पैकी ९५ गुण मिळवून कोल्हापूर विभागात प्रथम क्रमांक पटकावला.

द्वितीय - ०४ विद्यार्थी १०० पैकी ९१ गुण

तृतीय - १८ विद्यार्थी १०० पैकी ९० गुण

मार्गदर्शन सौ. कांबळे श्वेता किशोर

राष्ट्रभाषा प्राथमिक परीक्षा इ. ६ वी.

परीक्षेला बसलेले एकूण ३४ विद्यार्थी

उत्तीर्ण ३४ विद्यार्थी निकाल - १००%

प्रथम क्रमांक कु. प्रांजली जधव ८४/१००

द्वितीय क्रमांक कु. शिल्पा शिऊडकर ८०/१००

तृतीय क्रमांक कु. वनश्री कांबळे ७६/१००

कु. कपिल लिमये ७६/१००

या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले सौ. ए. एस. बागवे. मार्गदर्शक सौ. एस.बी. डोईफोडे .

**NTS, NMMS** या स्पर्धा परीक्षेला प्रशालेतील इयत्ता आठवीतील विद्यार्थी प्रविष्ट होतात या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेसाठी आपल्या प्रशालेतील विद्यार्थी बसतात. दोन्ही परीक्षांध्ये प्रशालेला चांगल्या प्रकारचे यश मिळत आहे. गेल्यावर्षी ४ विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळाली आहे.२०१० - ११ साठी परीक्षेला २० विद्यार्थी व परीक्षेला ११ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. या परीक्षेसाठी श्री. के.डी. कांबळेसर व श्री.ढोले आर.एन. हे मार्गदर्शक शिक्षक आहेत.

**के.टि.एस. परीक्षा (२०१०-११) -**

शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ मध्ये होणाऱ्या के टि एस परीक्षेसाठी प्रशालेतील श्री. बिरादार, श्री. कांबळे आर.वाय., श्री. गद्रे काम पाहतात.

**संगणक स्पर्धा परीक्षा**

संगणक जनरल नॉलेज या परीक्षेसाठी प्रशालेतील विद्यार्थी दरवर्षी बसतात. या वर्षी ही इ.९ वी तील ९८ विद्यार्थी व इ.७वीतील ६४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते.

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा**

सन २०१० -११ या विद्यमान वर्षी इयत्ता ५वी चे ४७ व ८वी चे १६ विद्यार्थी इतिहास प्रज्ञा शोध परीक्षेला बसले.

**चित्रकला विभाग २०१०-११**

महाराष्ट्र शासनाची चित्रकला स्पर्धा - सहभागी विद्यार्थी ६११

शासकीय रेखा व रंगकला परीक्षा -एलिमेंटरी / इंटरमिजिएट सहभागी विद्यार्थी ङ्ख ८२

सामाजिक वनीकरण आयोजित चित्रकला स्पर्धा

शालेय स्तरावरील क्रमांक:५ वी ते ७ वी ८ वी ते १० वी

प्रथमेश रा. नाचणकर, मयुर भरत भुवड,प्रणय उदय लिंगायत उन्नती अनिल झगडे,सुयश गोपाल सावंत,श्वेता तुलसीदास रोकडे

घाणेकर आळी मित्रमंडळ आयोजित चित्रकला स्पर्धा -

प्रथम - सिद्धेश संजय पांचाळ (६वी) द्वितीय - सुयश गोपाळ सावंत (६वी) तृतीय - ऋतुज सुरेश शिंदे (६वी)

टीस्कॉन श्रीकृष्ण जयंती निमित्त चित्रकला स्पर्धा -
५ वी ते ७ वी गट
प्रथम - पूर्वा जयंत चुणेकर

गीता मंडळ आयोजीत चित्रकला स्पर्धा
द्वितीय क्रमांक - प्रणय उदय लिंगायत

राष्ट्रवादी कॉंग्रेस शहर(मा. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त चित्रकला स्पर्धा)
इ. ५ वी ते ७ वी उत्तेजनार्थ - समीक्षा सुभाष भागवत
प्रथम - यशस्विनी रमेश लाकडे
इ.८ वी ते १० वी उत्तेजनार्थ - मयुरी भरत भुवड

नवनिर्माण हायस्कूल रत्नागिरी आयोजित चित्रकला स्पर्धा
प्रथम - सुयश गोपाल सावंत

**इंग्रजी विभाग -**

इंग्रजी विषयाच्या परीक्षेला फेब्रुवारी २०१० मध्ये इ. ५ वी ते ७ वी साठी ज्ञानपीठ परीक्षेसाठी एकूण १८४ विद्यार्थी बसले. सदर विषयासाठी विषय शिक्षकांनी इयत्तावार मार्गदर्शन केले. परीक्षेचा निकाल ८०% लागला. वर्ष २०१०-११ मध्ये प्रथमच इंग्रजी ऑलिंपीयाड परीक्षा सुरू करण्यात आली. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. इ. ५ वी ते १० वी अखेर एकूण ४८ विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले आहेत. या परीक्षेसाठी प्रशालेतील इंग्रजी विषय शिक्षक (सकाळ व दुपार सत्र) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. या बरोबरच इंग्रजी विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर, वाचन, पाठांतर आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

**क्रीडा विभाग -**

आमच्या प्रशालेतील विद्यार्थ्यांनी विविध शासकीय व खाजगी स्पर्धांध्ये सहभागी होऊन उज्वल यश संपादन केले आहे.उज्वल यश संपाद करण्यात श्री. विनोद मयेकर यांचा तसेच सौ.कांबळे, श्री. गद्रे यांचा मोलाचा वाटा आहे.

अ‍ॅथेलॅटिक्स, फुटबॉल, बास्केटबॉल, हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी,हॉकी, बुद्धीबळ, कॅरम, कुस्ती, क्रिकेट, कराटे, बॅडमिंटन,स्केटींग,थ्रो-बॉल, तायक्वॉंदो इ. खेळांच्या स्पर्धांध्ये स्पर्धांध्ये सहभागी होऊन यश संपादन केले आहे.तसेच वार्षिक स्नेहसॅलनाच्या निमित्ताने सांघिक खेळांचा आंतरशालेय क्रीडा महोत्सव घेण्यात आला. यामध्ये क्रिकेट,बुद्धीबळ, कॅरम, फुटबॉल, लगोरी इ. स्पर्धा इ. ५ वी ते ७ वी एक गट व इ. ८ वी एक गट या गटात घेण्यात आल्या.

राष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेले विद्यार्थी -
तायक्वॉंदो १) कु. शिवानी पांडुरंग काळै - इ. ८ वी अ
२) कु. तेजस्विनी सिताराम धणे - इ. ८ वी अ
तायक्वॉंदो १) अभिषेक किशोर कांबळे - इ.८ वी ड
क्रिकेट - १) सौरभ संदीप महाकाळ - इ. १० वी अ
२) प्रथमेश राजकुमार नाचणकर - इ. ७ वी अ
बॅडमिंटन १) स्नेहल सिताराम सावंत - इ. १० वी अ
कराटे १) राहील करीम जमादार - इ. १० वी अ
२) शरयु रवींद्र केळकर - ८ वी ब
राज्यस्तरीय स्पर्धेध्ये ५२ विद्यार्थी सहभागी झाले.

तालुकास्तरीय स्पर्धेध्ये कबड्डी, खो-खो, कुस्ती आणि मैदानी स्पर्धांत यश संपादन करून जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी झाले तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेध्ये सुबोध मुखर्जी, शालेय फुटबॉल, कुस्ती, बॅडमिंटन, बुद्धीबळ, बास्केटबॉल, क्रिकेट, योगासन, हॉकी, जलतरण, थ्रो बॉल, हॅन्डबॉल, मैदानी स्पर्धा कॅरम इ. स्पर्धेत सहभागी होऊन यश संपादन केले आणि विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच विभागीय स्पर्धेध्ये बुद्धीबळ, कुस्ती, योगासन,जलतरण, हॉकी, बॅडमिंटन, तायक्वॉंदो,क्रिकेट, मैदानी स्पर्धा इ.स्पर्धेतून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

**स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग अहवाल -**

स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग हे दोन विभाग प्रशालेध्ये सहशालेय कार्यक्रमाचे आयोजन करतात. विद्यमान वर्षी (२०१०-११) साली सकाळ सत्रात सौ. कोळपे व दुपार सत्रात सौ. सप्रे या स्वराज्यसभेचे कामकाज पाहतात. सांस्कृतिक विभागाचे काम सकाळ सत्रात श्री. आयरे दुपार सत्रात श्री. कांबळे आर.वाय.पाहतात. सन २०१०-११ या वर्षी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात स्वराज्यसभेच्या निवडणुका पार पाडल्या. यामध्ये कु.शिवराज ठिक हा विद्यार्थी प्रतिनिधी तर कु. पूज प्रभू ही विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून निवडून आले. स्वराज्य सभेच्या तीन सभा विद्यमान वर्षी आयोजित करण्यात आल्या. या सभांध्ये शालेय शिस्त,सांस्कृतिक कार्यक्रम इ. विषयांवर विचार विनिमय करण्यात आला.विविध सहशालेय, सांस्कृतिक कार्यक्रमाचे स्वरूप ठरविणे, वर्गणी गोळा करणे, इ. विषयांवर भर देण्यात आला.लोकसंख्या विस्फोट दिन, लोकमान्य टिळक पुण्यतिथी,महात्मा गांधी जयंती, शिक्षक दिन, वनमहोत्सव, एड्स सप्ताह,रक्षाबंधन, नारळी पौर्णि, इ. कार्यक्रम ठळक स्वरूपात आणि इतर क्षमयोचित कार्यक्रम असे कार्यक्रम साजरे करण्यात आले. विविध स्मृतिदिन पाळण्यात आले.या सर्व कार्यक्रमांना माननीय मुख्याध्यापकांनी कार्यक्रमापूर्वी आणि प्रत्यक्ष कार्यक्रमामध्ये मौलिक मार्गदर्शन केले.या सर्व कार्यक्रमांध्ये उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सहकार्यवाह, ज्येष्ठ शिक्षक उपस्थित होते.

**परीक्षा विभाग -**

आमच्या प्रशालेचा परीक्षा विभाग हा महत्त्वाचा भाग आहे.या विभागामार्फत प्रशालेतील चाचणी परीक्षा, सत्रांत परीक्षा १ व २ इयत्ता १० वी च्या सराव परीक्षा, पूर्व परीक्षा यांचे नियोजन केले जते. मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थी समितीचे सदस्य,

सर्व शिक्षक यांच्या सहकार्याने परीक्षेचे काम पूर्ण केले जते.सन २०१० -११ या शैक्षणिक वर्षात परीक्षा विभागाचे काम श्री. शेलार सर व श्री चव्हाण र.भि. पाहत आहेत. छरीक्षा विभागात श्री. वजेकर (सेवक) व श्री. कांबळे द.कृ.(सेवक) यांचे सहकार्य चांगले मिळत असते.

## स्पर्धा विभाग -

सन २०१० -११ या शैक्षणिक वर्षात रा. भा. शिर्के प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सुलेखन, निबंध, वक्तृत्व, कथाकथन,नाट्यवाचन, पठण यासारख्या विविध स्पर्धांत सहभागी होऊन भरघोस यश प्राप्त केले. - लोकमान्य स्मृती शालेय निबंध स्पर्धा प्रथम - दुर्वा सुतार, द्वितीय - तेजस चव्हाण, मधुरा नाखरेकर (विभागून) तृतीय - रचिता पाथरे गीता मंडळ - देवश्री शिंदे (गुरुकूल) प्रथम कथाकथन स्पर्धा - रत्नागिरी शहर वाचनालय १) चैतन्य वैद्य २) मानसी भिडे ३) श्रीलेखा आरगे ४) आसक्ती आखाडे

राष्ट्रसेविका समिती क्रांती दिनानिमित्त कथाकथन -

प्रथम - आखाडे आसावरी

सानेगुरुजी कथाकथन - आखाडे आसावरी

वक्तृत्व स्पर्धा - नगर परिषद लोकमान्य टिळक पुण्यतिथी

गट - ४ प्रथम - अनुज आखाडे द्वितीय - तेजस चव्हाण

गट - ५ प्रथम - आखाडे आसावरी

द्वितीय - सुयश चव्हाण तृतीय - मीरा चव्हाण

* यशवंत व्यासपीठ कऱ्हाड-राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा सहभाग -आसावरी आखाडे

* नाट्यवाचन स्पर्धा-* शालेय स्तर - गट-१ प्रथम - मीरा चव्हाण द्वितीय - रावराणे कोल

गट २ प्रथम - कांबळे कल्पेश द्वितीय - पाथरे रचिता

आंतरशालेय नाट्यवाचन स्पर्धा (जी.जी.पी.एस.)

द्वितीय - सावंत स्मितल उत्तेजनार्थ - पाथरे रचिता

पाठांतर - मनाचे श्लोक - प्रथम पाटील मानस मदन

* गीता मंडळ आयोजित - गीता जयंती उत्सव निमित्त

भक्तिगीत - तृतीय - रावणांग कोल उत्तेजनार्थ - चव्हाण सायली

रांगोळी - द्वितीय - नेने नेहा तृतीय - शिंदे हर्षदा

सुलेखन - प्रथम - कांबळे वनश्री उत्तेजनार्थ -सोनवणे माधुरी

विद्यार्थ्यांच्या अंगी देशप्रेम , सैनिकी शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी शाळेत आठवी , नववी च्या वर्गातील ५०एन.सी.सी.छात्रांची निवड एन.सी.सी युनिटचे कमांडिंग ऑफि सर,कमांडर यादव साहेब व पी. आय. स्टाफ ने केली आहे. एन.सी.सी विभागामार्फत वर्षभर वेगवेगळे उपक्रम सहभागातून यशस्वी केले जतात. जुलै २०१० मध्ये ८ वी तील १९ छात्र व ८ छात्रांची निवड केली आहे. तर इ. ९ वी मध्ये १५ छात्र मिळून एकूण - ३४+१६= ५० छात्र -छात्रा प्रशिक्षण घेत आहेत. या विभागाचे ऑफिसर श्री.सी.एस. पाटील गेली २० वर्षे काम पाहतात.१५ ऑगस्ट २०१० रोजी निवडलेल्या एन.सी.सी.छात्रांधून ०३ - P.O. कॅडेट व ०६ लिडिंग कॅडेटची निवड केली जते. यांना १५ ऑगस्ट २०१० 'स्वातंत्र्य दिनी' या छात्रांना मा. मुख्याध्यापकांच्या हस्ते प्रमोशन देण्यात येते.P.O. कॅडेट - चिन्मय सुर्वे, अमेय गोगटे व मृणाल गोगटे यांना देण्यात आले.

वृक्षारोपण कार्यक्रम ५ ऑगस्ट २०१० रोजी शाळेच्या प्रांगणात उप वनविभाग रत्नागिरी (चिपळूण) - पाली परिक्षेत्र विभागामार्फत वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात जिल्हा परिषद-उपाध्यक्ष-उदय बने, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशाभाऊ शिनगारे यांच्या हस्ते करण्यात आहे.

A.T.C. कॅम्प :

१० नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर २०१० या कालावधीत रत्नागिरी घेण्यात आला. या कॅम्प मध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत शाळेच्या एन. सी. सी. छात्र-छात्रांनी घवघवीत यश संपादन केले. छात्रांनी मिळविलेली पारितोषिके -

सांघिक - १) टग ऑफ वॉर - प्रथम - शिल्ड २) बेस्ट लाईन एरिया - प्रथम - शिल्ड ३) शीप मॉडेलिंग - प्रथम गोल्ड ४) बेस्ट इन अॅकॅडमिक - द्वितीय - सिल्व्हर वैयक्तिक -१) P/O मृणाल ढोले - ओव्हर ऑल बेस्ट कॅडेट बेस्ट ड्रील - प्रथम गोल्ड रनिंग - द्वितीय सिल्व्हर २) श्रुती मणेरीकर - रनिंग - प्रथम गोल्ड सोफोर प्रथम गोल्ड L/ CDT7 ऋतुज भडाळे, तेजस चव्हाण, अंकिता मोरे, सुरभी सुर्यवंशी, चिन्मय सुर्वे या छात्रांनी विविध स्पर्धेत यश संपादन केले. तर कॅडेट मनिष परब - रनिंग प्रथम गोल्ड. NCC DAY -No.२ महाराष्ट्र नेव्हेल युनिट एन.सी.सी.मार्फत २८ नोव्हेंबर २०१० रोजी एन.सी.सी. डे साजरा करण्यात आला. या परेडचे परेड कमांडर श्री. सी.एस.पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी - प्राचार्य मा. देव सर व कमांडींग ऑफिसर कमांडर -यादव साहेब यांना मानवंदना दिली. या वेळी एन.सी.सी. ऑफिसर श्री.सी.एस. पाटील यांना लाईफ अॅचिवमेंड, पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. एन.सी.सी. डे च्या संचलनात व सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेच्या छात्रांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

**जनजगृती फेरी** : रत्नागिरी भारत निर्माण लोकमाहिती अभियान - या स्तुत्य उपक्रमाची जनजगृती फेरी १३ डिसेंबर २०१० रोजी रत्नागिरी शहरात काढण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी मधुकर गायकवाडी यांच्या हस्ते झाले. या जनजगृती फेरीत शाळेच्या एन.सी.सी. छात्रांनी सहभाग घेऊन रॅली यशस्वी केली.

क्षेत्र भेट व ट्रेकिंग -रत्नागिरी भगवती बंदर या ठिकाणी आलेल्या INS रत्नागिरी या युध्द नौकेला भेट देण्यात NCC छात्र गेले होते.

शिबिर : २४ डिसेंबर २०१० रोजी शीळ येथे एक दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले या वेळी ठिकाणाची स्वच्छता व छात्रांनी स्वत: जेवण बनविले. यावेळी घेण्यात आलेल्या स्पर्धेत एन.सी.सी. छात्रांनी प्रथम क्रमांक मिळविला.

सर्टिफिकेट परीक्षा २०१०-फेब्रुवारी २०१० मध्ये घेण्यात आलेल्या सर्टिफिकेट परीक्षेध्ये २७ एन.सी.सी. छात्रांनी भाग

घेतला होता. सर्व छात्र पास झाले असून एन.सी.सी. विभागाचा १००% निकाल लागला आहे.या वर्षभरात घेतलेले उपक्रम यशस्वी करण्यासाठी नं.२ महाराष्ट्र नेव्हल युनिट एन.सी.सी. चे कमांडिंग ऑफिसर कमांडर यादव साहेब, शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. एम. कांबळे सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विविध उपक्रमात यश प्राप्त केलेल्या एन.सी.सी. छात्रांचे शाळेच्या सर्व शिक्षक वर्गाने व विद्यार्थ्यांनी कौतुक केले

**महाराष्ट्र छात्रसेना -**

सन २०१०-११ या वर्षी आपल्या प्रशालेत इ. ८ वी इ. ९ या दोन वर्गातून एम.सी.सी. हा विषय ऐच्छिक आहे. त्या वर्गातील विद्यार्थी संख्या खालील प्रमाणे

इ. ८ वी मुले मुली एकूण इ. ९ वी ६६ ६४ १३० एकूण २५७
६७ ६० १२७

२) विविध उपक्रमात सहभाग.

१) जगतिक लोकसंख्या इशारा दिन कार्यक्रम इ. ९ वी चे विद्यार्थी.

२) ९ ऑगस्ट रोजी रत्नागिरी येथे क्रांतिदिन कार्यक्रम जयस्तंभ येथे रॅलीमध्ये १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३) १५ ऑगस्ट २०१० रोजी स्वांतत्रदिन सोहळा पोलीस परेड ग्राऊंड झेंडावंदन, प्रभातफेरी व सहभाग घेतला.

४) मुंबई आंतकवादी हल्ला शहीद जवान श्रद्धांजली कार्यक्रम

५) जगृती एड्स दिन कार्यक्रम.

६) सशस्त्र सेना ध्वजदिन कार्यक्रम विद्यार्थी गार्ड ऑनर स्वागतगीत सहभाग.

७) भारत निर्माण लोक माहिती अभियान मध्ये १०० विद्यार्थी सहभागी.

**स्काऊट - गाईड -**

सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षाध्ये प्रशालेध्ये स्काऊटची ६ पथके व गाईडची ६ पथके कार्यरत आहेत. स्काऊट मास्टर म्हणून श्री. पोवार बी. डी., श्री. चव्हाण आर. बी.,श्री. देवळेकर एन. टी., श्री. माळगे आर.एस., श्री. आयरे एस.वाय. हे काम पाहतात व गाईड प्रशिक्षिका सौ. कोळपे एन.व्ही.,सौ. साखळकर एस.डी., सौ. कांबळे एस.के., सौ. बागवे ए.एस., सौ. जधव पी.एस., सौ. दुदगीकर एस.डी. हे काम पाहतात.यावर्षी आपल्या प्रशालेतील इ. ८ वी तील स्काऊट चे १२विद्यार्थी व स्काऊट मास्टर म्हणून श्री. माळगे आर.एस. हे हैद्राबाद -आंध्रप्रदेश शंकरापल्ली येथे इंटरनॅशनल जंबोरी साठी गेलेले आहेत.सन २०१०-११ या वर्षातील एक दिवसीय स्काऊट-गाईड शिबिर शिरगाव शेती फार्म शिरगाव येथे ४०० विद्यार्थी व ११ शिक्षक यांच्या समवेत संपन्न झाले.

**हरितसेना अहवाल**

१) सन २०१०-११ जून महिन्यामध्ये दि. १६/६/२०१०रोजी वार्षिक नियोजन.

२) जुलै महिन्यामध्ये ८/७/२०१० रोजी ‘एक मूल एक झाड’ कार्यक्रम घेण्यात आला.

३) जुलै २९/७/२०१० रोजी मा. कलेक्टर साहेबांच्या हस्ते व परिक्षेत्र वन अधिकारी यांच्या हस्ते शाळेच्या आवारात वृक्षलागवड करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मा. श्री. उदयजी बने उपस्थित होते.

४) शाळेचा विद्यार्थी जधव व त्यांचे मित्र पाडाळकर यांनी विषारी सर्प बिन विषारी सर्प यांची माहिती दिली.

**पर्यावरण विभाग अहवाल**

सन २०१० -२०११ या शैक्षणिक वर्षातील खातेवाटप शिक्षक सभा ७ जुलै २०१० रोजी शिक्षक विश्रामिकेत संपन्न झाली. त्यानुसार सकाळ सत्रात सौ. बागवे ए. एस. व दुपार सत्रात श्री. बिरादार एम. पी हे पर्यावरण विभागासाठी प्रमुख नेले गेले.वार्षिक नियोजनाप्रमाणे प्रथम जूनमध्येच पर्यावरण मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळात पर्यावरण विभागप्रमुख तसेच प्रशालेचे विद्यार्थी आणि विद्यार्थीनी प्रतिनिधी तसेच प्रत्येक तुकडीतून सदस्य विद्यार्थी विद्यार्थीनींची निवड करण्यात आली.

१० जुलै २०१० रोजी पर्यावरण विभागाची पहिलीच सभा घेण्यात आली. भारतीय पर्यावरण शास्त्र व तंत्रज्ञान संस्था मुंबई यांचे मार्फत ‘घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प’ याविषयी चर्चा विनिमय करण्यात आले. त्याप्रमाणे संबंधित शिक्षकांनी कार्यवाही सुरु केली आहे.दि. १२ जुलै २०१० रोजी ‘जगतिक लोकसंख्या विस्फ ोट दिन’ साजरा करण्यात आला. यानिमित्ताने ५ वी ते ७ वी च्या गटात निबंधस्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक वर्गातून तीन क्रमांक काढले त्यानंतर त्यातून तीन क्रमांक ५ वी ते ७ वी गटात काढले गेले.लोकसंख्या विस्फोट दिनाविषयी सौ. अभ्यंकर यांनी आपले विचार मांडले. सदर कार्यक्रम मा. मुख्याध्यापक श्री. कांबळे सर उपमुख्याध्यापक श्री. बी. डी. पोवार यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.दि. १८ ऑगस्ट २०१० रोजी नगरवाचनालयाच्या श्रीमान भागोजीशेठ कीर सभागृहात ‘निसर्गवाचन’ कार्यक्रम संपन्न झाला.पूज भाले यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी इयत्ता ९ वी अ चा वर्ग उपस्थित होता. सोबत सौ. बागवे श्री. कांबळे के.डी, सौ. काजेकर उपस्थित होते.दि. १४ सप्टेंबर रोजी ‘जगतिक ओझोन दिन’ प्रशालेच्या रंजमंदिर सभागृहात संपन्न झाला. या दिनाविषयीचे सद्यस्थितीचे विचार सौ. बागवे ए. एस. यांनी उदाहरणे देऊन स्पष्ट केले.कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापक श्री. पोवार सर श्री. शेलार सर उपस्थित होते. दि. २ ऑक्टोबर रोजी परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

शुक्रवार दिनांक २४/१२/२०१० रोजी मत्स्य महाविद्यालय शिरगाव येथे क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती. मुलांना मत्स्य जलशास्त्र विभागातर्फे मत्स्यसंवर्धन आणि मत्स्यनिर्मितीच्या प्रकल्पांची माहिती करुन घेता आली. गोड्या पाण्यातील शोभिवंत माशांचे संवर्धन व प्रजनन याची माहिती कु. दिप्ती सावंत हिने दिली. जलशास्त्र विभागाचे मासे आणि शंखांचे संग्रहालय पहिले. प्रश्नावलीच्या माध्यमातून मुलांना सागरी जलसंपत्ती आणि जैवविविधता याचा प्रत्यक्ष अनुभव मुलांना घेता आला. **शुक्रवार दि. ७/१/२०११ रोजी 'वाघ वाचवा' 'या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. या** गटचर्चेचे नियोजन संयोजन सौ. ए. एस. बागवे यांनी केले होते.पर्यावरण जाणीव जागृती निर्माण करणे हा हेतू या उपक्रमामागे होता.दि. २१/०१/२०११ रोजी 'कागदी-कापडी पिशव्या' हा दुसऱ्या सत्रात ५वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांकडून हा उपक्रम राबविण्यात आला. उपक्रमाला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला.

**शास्त्र विभाग अहवाल -**

नियोजनाप्रमाणे सभा आणि शाळाबाह्य परीक्षा व उपक्रमात सहभाग नोंदविला गेला. सायन्स ऑलिंपीयाड या परीक्षेसाठी २९विद्यार्थी सहभागी झाले. या परीक्षेसाठी श्री. कांबळे के.डी.,सौ.आगाशे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेसाठी सौ. आगाशे यांनी मार्गदर्शन केले.विज्ञान मंच परीक्षेसाठी प्रशालेतील सर्व शास्त्र शिक्षकांनी मार्गदर्शन केले. या परीक्षेत ३ विद्यार्थी सहभागी झाले. पुण्यातील असिमीत संस्थेतर्फे राबविण्यात आलेल्या आकाशदर्शन या कार्यक्रमात प्रशालेतील ६०० विद्यार्थ्यांनी अवकाश निरीक्षणाचा लाभ घेतला. यासाठी श्री. कांबळे के. डी. यांनी विशेष प्रयत्न केले.तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रश्न मंजूषा स्पर्धेत ३विद्यार्थी सहभागी झाले. तसेच सांडपाण्यापासून वीजनिर्मिती हा प्रकल्प मांडण्यात आला. 'पडदा पाडा रे !' ही विज्ञान नाटिका सादर करण्यात आली. या नाटिकेला प्रथम क्रमांक मिळून जिल्हा स्तरासाठी निवड झाली. या नाटिकेसाठी श्री. चव्हाण, श्री. आयरे, श्री. पडवेकर, सौ. कांबळे, सौ. आगाशे यांनी मार्गदर्शन केले. प्रश्नमंजूषेसाठी श्री. वासावे , सौ. पाटील, श्री. कांबळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रकल्प निर्मितीसाठी श्री. कांबळे, श्री. ढोले, श्री. पडवेकर, श्री. बिरादार व श्री. लिंगायत यांनी मार्गदर्शन केले.

**ग्रंथालय विभाग -** प्रशालेत प्रशस्त ग्रंथालय असून ग्रंथालयात विविध प्रकारचे संदर्भ ग्रंथ आहेत. एकूण पुस्तक संख्या ८५०० एवढी आहे. विद्यार्थी वाचनालयाचा लाभ उत्तम प्रकारे घेतात. ग्रंथालयाचे काम सौ. स्मिता सुहास चव्हाण पाहतात.ग्रंथ संपदेत वाढ व्हावी या दृष्टीने वाढदिवसानिमित्त पुस्तक रूपाने देणगी दिली जाते. 'श्री' चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांचे तर्फे विद्यार्थी -शिक्षकांना उपयुक्त असे ८६ ग्रंथ भेट म्हणून मिळाले. यासाठी श्री.देवळेकर यांनी प्रयत्न केले.

**संगणक विभाग -**

सुसज्ज अशी संगणक प्रयोगशाळा आहे, या विभागामध्ये एकूण २० संगणक आहेत. गुरुकुल ल.ग.प. आणि रा.भा.शिर्के मिळून जवळजवळ १२०० विद्यार्थी येथे संगणक शिक्षण घेत आहेत.

*** शालेय किशोरावस्था जीवन कौशल्य शिक्षण कार्यक्रम (सालसेप)**

१) शैक्षणिक वर्ष सन २०१०-११ मध्ये सालसेप अंतर्गत पौगंडावस्था व जीवनकौशल्य या संदर्भात सौ. पाटील एस.एन. (नोडल टीचर) यांनी विद्यार्थिनींना माहिती दिली.

२) १ डिसेंबर - जागतिक एड्स दिन.

या दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी श्री.सोहोनी व्ही. जे. (माजी मुख्याध्यापक) आमंत्रित करण्यात आले होते. तसेच एड्स या रोगाविषयी जाणीव - जागृती करण्यासाठी प्रशालेच्या रंगमंदिर मध्ये तक्ते, चित्रे, कात्रणे यांचे छोटे खानी प्रदर्शन मांडण्यात आले होते. विद्यार्थ्यांना या प्रदर्शनाचा चांगला लाभ घेतला.

**व्यवसाय मार्गदर्शन -**

प्रशालेध्ये इ. ९ वी व १० वी साठी कार्यानुभव विषयांतर्गत व्यवसाय मार्गदर्शन हा विषय शिकवला जातो. या विषयांतर्गत व्यवसाय मार्गदर्शन वर्ग, अभिरुची चाचणी, प्रकल्प निर्मिती, व्यवसाय मार्गदर्शन कोपरा सजवट इ. उपक्रम राबविले जातात. याचे काम श्री. कांबळे आर.वाय. पाहतात.

**सहल विभाग -**

शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये पुढील प्रमाणे सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. एक दिवसाच्या सहली - १) ड्रीम वर्ल्ड - कोल्हापूर २) प्रतापगड,महाबळेश्वर ३) मालवण सिंधुदुर्ग दोन दिवसांच्या सहली - १) सिंधुदुर्ग दर्शन २) गोवा दर्शन सहा दिवसाची सहल - १) म्हैसूर, बंगलोर, उटी आजपर्यंत १ दिवसाच्या सहलीसाठी ५०० विद्यार्थ्यांनी नावे नोंदवली असून गोवा दर्शनासाठी ८० विद्यार्थी आणि ६ दिवसाच्या सहलीसाठी २५ विद्यार्थ्यांनी सहभाग दाखवला आहे.श्री. मयेकर सर व सौ. अभ्यंकर मॅडम काम पाहतात.

**गरीब विद्यार्थी निधी -**विद्यार्थ्यांना आर्थिक हातभार मिळाला की, त्यांच्या जिद्दीला व हुशारीला अधिक धुमारे फुटतात. तो अधिक अभ्यास करून प्रगती संपादन करतो. असा आजवरचा अनुभव आहे.हे लक्षात ठेवून यंदा २५ जणांना वह्या वितरण, ६ जणांना गणवेश तर ४० विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काचे वितरण करण्यात आले. यावर्षी प्रशालेच्या अनेक माजी विद्यार्थी व हितचिंतकांनी गरीब विद्यार्थी निधीस आर्थिक देणग्या दिल्या. त्यात प्रामुख्याने श्री. नंदादीप सुर्वे,पुणे यांच्या ५०००/- रु. देणगीचा समावेश आहे. या विभागाचे काम श्री. देवळेकर सर पाहतात.

**पालक शिक्षक संघ -**

सन २०१०/११ यावर्षी पालक शिक्षक संघाची सहविचार सभा १, कार्यकारी मंडळ सभा १ व इ. ५ वी ते १० वी च्या वर्गवार सभा दोन वेळा घेण्यात आल्या. या सर्वच सभांना पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. विद्यार्थ्यांची प्रगती अपेक्षित दिशेने होत असल्याचेच हे द्योतक आहे असे वाटते. या पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. शं. मा. कांबळे सर व कार्यवाह म्हणून श्री.देवळेकर सर काम पाहतात.

## विज्ञान दिन व कै. अरुअप्पा जोशी स्मृतीदिन

दि. २८ फेब्रु. २०११ रोजे प्रशालेत कै. अरुअप्पा जेशी स्मृती दिन आणि विज्ञान दिन संयुक्तरित्या आयोज्ति करण्यात आले. प्रशालेचे पर्यवेक्षक श्री. पाटील सी. एस्. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विज्ञान दिन कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सौ. जेशी यांनी विद्यार्थ्यांना बहुोल मार्गदर्शन केले. संस्थेचे सहकार्यवाह श्री.देवळेकर एन्. टी. यांनी विज्ञान दिनाच्या निमित्ताने होंी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्ा विद्यार्थी सुयश सावंत याचे कौतुक केले आणि विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अरुअप्पा विषयी अतिशय भावूपर्ण असे मनोगत व्यक्त करताना श्री. देवळेकर यांनी संस्थेच्या उभारणीसाठी अप्पांची भूमिका, निष्ठा व तळमळ सांगून अप्पांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. एस्. एम. कांबळे यांनी विज्ञान दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक वृत्ती, ज्ज्ञिासू वृत्ती यांची जेपासना करावी असे आवाहन केले. विज्ञान प्रदर्शनामध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले.

कै. अरुअप्पा जेशी यांच्या बद्दलच्या अनेक आठवणी आणि आप्पांचा सकारात्मक दृष्टीकोन आणि मार्गदर्शन याविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. स्वराज्य सभा प्रमुख सौ. सप्रे मॅडम यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

## जागतिक महिला दिन

दि. ९ मार्च २०११ रोजे प्रशालेत जगतिक महिला दिन कार्यक्रम आयोज्ति करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. आर. वाय. कांबळे यांनी केले. त्यानंतर प्रातिनिधीक स्वरुपात प्रशालेतील शिक्षिका सौ. सप्रे एस.यु. यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेचे सहकार्यवाह श्री. देवळेकर एन.टी. यांनी महिला दिनाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. कांबळे एस. एम्. यांनी आपल्या भाषणात स्त्री-पुरुष समानता या मुल्याची जेपासना करणे आवश्यक आहे असे आवाहन केले.

**शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा - २०१०**

यशस्वी विद्यार्थी.* एलिमेंटरी चित्रकला ग्रेड परीक्षा सहभागी विद्यार्थी - ५१, रज - ०३ निकाल - १००% ए श्रेणीधारक - १४, बी - श्रेणीधारक - १५, सी श्रेणीधारक - २० * इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षा :सहभागी विद्यार्थी- ३१, रज- ०१, निकाल १००% ए श्रेणीधारक - ०५, बी - श्रेणीधारक - ०९, सी श्रेणीधारक - १६ * सी स्काय टेलिस्कोप आणि गोगटे जेगळेकर कॉलेज यांच्यामार्फत अवकाशाची माहिती या विषयावर चित्रकला स्पर्धा-२०१० गट - ५ वी ते ७ वी. सुयश गोपाळ सावंत - ६ वी प्रथम * गीता मंडळ आयोज्ति चित्रकला स्पर्धा - २०१०.द्वितीय क्रमांक - प्रणय उदय लिंगायत - ६ वी.मार्गदर्शक : कलाशिक्षक - श्री. लिंगायत सर.

**राष्ट्रीय स्काऊट गाईड जंबोरी** -हैद्राबाद, शंकरपल्ली

सहभागी स्काऊटस -१) चैतन्य श्रीरंग वैद्य २) साईराज रविंद्र पवार ३) योगेश अरुण उंदरे ४) साईराज महेश महामुनी ५) साज्दि इरफान खान ६) सुमित सुनिल चवेकर ७) ओंकार सुधाकर सावंत ८) अभिषेक अरुण नागले ९) हेंत श्रीकांत अवसरे १०) शशांक सुरेंद्र मांजरेकर ११) शुभम लंबोदर करमकर दि. १/१/११ रोजे रा. भा. शिर्के प्रशाला स्काऊट विभाग इ.८वी मधील ११ विद्यार्थी व शिक्षक श्री. माळगे आर.एस.हे हैद्राबाद, शंकरपल्ली येथील राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय जंबोरीत सहभागी झाले होते.दि. ८/१ समारोप कार्यक्रम दिपवून टाकणारा होता.आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री रेड्डी उपस्थित होते. एक लाख लोक उपस्थित होते. प्रत्येकाच्या डोळ्यातून अश्रु वाहत होते. इतका सुंदर कार्यक्रम होता. या जंबोरीला संपूर्ण भारतातून १८ हजर विद्यार्थी,शिक्षक, इतर कर्मचारी मिळून ३० ते ४० हजर लोक उपस्थित होते. प्रत्येक राज्यातील विद्यार्थी शिक्षक यांची विचारांची देवाण घेवाण व ओळख झाली.

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा -**

इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इतिहास प्रज्ञा शोध परीक्षेला इ. ५ वी च्या वर्गातील एकूण ४७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. ३१ विद्यार्थी उतीर्ण झाले.या परीक्षेला श्रीम. जेशी एस.एस., श्री. पाटील सी.एस., श्री. चव्हाण आर.बी., श्री. चव्हाण ए.पी. यांनी सहकार्य केले.

**राष्ट्रीय अंधकल्याण निधी**-राष्ट्रीय अंधकल्याण निधीला इ. ५ वी ते ९ वी या वर्गातील विद्यार्थ्यांनी सुमारे २७,००० रुपये मिळवून दिले.